# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २०/११/२०१७

## आदिवासी महिलेवर नक्षल्यांचा जीवघेणा हल्ला

काल दिनांक १९/११/२०१७ रोजी रात्री ११.०० वा. नक्षल्यांनी भामरागड तालुक्यातील लाहेरी येथे राहणाऱ्या मुरा गुड्डी परसा यांच्यावर बंदुकीने गोळया झाडून हल्ला केला. यामध्ये मुरा परसा यांची पत्नी जैनी मुरा परसा, वय ३५ वर्षे या गंभीर जखमी झाल्या. या हल्ल्यामध्ये जैनी परसा यांच्या डाव्या पायाच्या मांडीला गोळी लागल्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या आहेत.

काल दिनांक १९/११/२०१७ रोजी मुरा परसा हे पत्नी व दोन मुलींसह घरामध्ये झोपले असताना रात्री काही नक्षलवादी घराजवळ येऊन दारावर जोरात आदळ आपट करु लागले. परंतु मुरा परसा यांनी दरवाजा न उघडल्यामुळे नक्षल्यांनी खिडकीतुन गोळीबार केला. यामध्ये मुरा परसा यांची पत्नी जैनी परसा या गंभीर जखमी झाल्या. गोळीबारानंतर मुरा परसा यांनी आरडा-ओरडा केल्यामुळे नक्षल्यांनी त्या ठिकाणहून पळ काढला.

त्यानंतर मुरा परसा यांनी गावकऱ्यांच्या मदतीने पत्नीला तात्काळ लाहेरी येथील दवाखान्यामध्ये दाखल केले व घटनेची माहिती उपपोस्टे लाहेरी येथे कळविली. घटनेची माहिती मिळताच उपपोस्टे लाहेरी येथील अधिकाऱ्यांनी जखमींची भेट घेतली व विचारपूस केली. प्रथमोपचारानंतर आज दिनांक २०/११/२०१७ रोजी जैनी परसा यांना पुढील उपचाराकरीता अहेरी येथील दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी, श्री. गजानन टोंपे, पोलीस निरीक्षक अहेरी श्री. सुरेश मदने यांनी तात्काळ जखमी जैनी परसा यांची दवाखान्यामध्ये भेट घेवून विचारपूस केली.

आदिवासी महिलेवर अशा पध्दतीचा भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न महिलेच्या प्रसंगावधानामुळे फसला. त्याबद्दल तिच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. तर नक्षलवादयांच्या या कृतीचा तिव्र निषेध सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.